# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, एप्रिल २४, १९९९/वैशाख ४, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

**सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.**—संघटित गुन्हेगारी संघटना किंवा टोळी यांच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी, त्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांना तोंड देण्यासाठी आणि तत्संबंधातील किंवा तदनुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता अधिनियम .. .. .. .. पृष्ठे ४१४–४३०

दिनांक २३ एप्रिल १९९९ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,<br>
सचिव,<br>
महाराष्ट्र शासन,<br>
विधी व न्याय विभाग.

## सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

(राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २४ एप्रिल १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**संघटित गुन्हेगारी संघटना किंवा टोळी यांच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांना तोंड देण्यासाठी आणि तत्संबंधातील किंवा तदनुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी**, संघटित गुन्हेगारी संघटना किंवा टोळी यांच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांना तोंड देण्यासाठी आणि तत्संबंधातील किंवा तदनुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांकरिता कायदा करण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती आणि म्हणून, त्यांनी दिनांक २४ फेब्रुवारी १९९९ रोजी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अध्यादेश, १९९९ प्रख्यापित केला होता ;

१९९९ चा महा. अध्या. ३.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू होईल.

(३) तो दिनांक २४ फेब्रुवारी १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. (१) या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "अपप्रेरणा देणे" यामध्ये, त्याचे व्याकरणिक फेरफार आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह पुढील गोष्टी अंतर्भूत आहेत,—

(एक) जी व्यक्ती संघटित गुन्हेगारी संघटनेला कोणत्याही प्रकारे मदत करीत आहे अशी प्रत्यक्ष माहिती आहे किंवा तसे वाटण्यास कारण आहे अशा कोणत्याही व्यक्तीशी संपर्क किंवा संबंध ठेवणे ;

(दोन) कोणत्याही कायदेशीर प्राधिकाराशिवाय, संघटित गुन्हेगारी संघटनेस मदत होण्याची शक्यता असेल अशी कोणतीही माहिती पुढे पाठवणे किंवा प्रसिद्ध करणे आणि संघटित गुन्हेगारी संघटनेकडून मिळालेला कोणताही दस्तऐवज किंवा मजकूर पुढे पाठवणे किंवा प्रसिद्ध करणे किंवा वितरित करणे ; आणि

(तीन) संघटित गुन्हेगारी संघटनेला वित्तीय किंवा अन्य प्रकारचे सहाय्य करणे ;

(ख) "संहिता" याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ असा आहे ; १९७४

(ग) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ, कलम १३ अन्वये नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे ; चा २.

(घ) "चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य" याचा अर्थ, ज्याच्या बाबतीत मागील दहा वर्षांच्या कालावधीत, एकापेक्षा अधिक आरोपपत्रे सक्षम न्यायालयापुढे दाखल करण्यात आलेली असतील आणि अशा अपराधाची त्या न्यायालयाने दखल घेतलेली असेल असे, संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे हाती घेतलेले, दखलपात्र अपराध असून तीन किंवा त्याहून अधिक वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे प्रतिषिद्ध ठरविण्यात आलेले कृत्य, असा आहे ;

(ङ) "संघटित गुन्हेगारी" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने अवैध मार्गांनी आर्थिक लाभ मिळविण्याच्या किंवा स्वतःसाठी किंवा कोणत्याही अन्य व्यक्तींसाठी गैरवाजवी आर्थिक किंवा इतर फायदा मिळविण्याच्या किंवा उठाव करण्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एक तर संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करून किंवा हिंसाचार करण्याची धमकी देऊन किंवा धाकदपटशा किंवा जबरदस्ती करून किंवा अन्य बेकायदेशीर मार्गांनी चालू ठेवलेले कोणतेही बेकायदेशीर कृत्य, असा आहे ;

(च) "संघटित गुन्हेगारी संघटना" याचा अर्थ, संघटना किंवा टोळी म्हणून एकट्याने किंवा संयुक्तपणे संघटित गुन्हेगारी कृत्ये करणारा दोन किंवा अधिक व्यक्तींचा गट, असा आहे ;

(छ) "विशेष न्यायालय" याचा अर्थ, कलम ५ अन्वये रचना केलेले विशेष न्यायालय असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि संहितेमध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, संहितेमध्ये त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आल्याप्रमाणे अर्थ असतील.

३. (१) जी कोणी व्यक्ती संघटित गुन्हेगारीचा अपराध करील ती,— संघटित गुन्ह्यासाठी शिक्षा.

(एक) जर अशा अपराधामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाला असेल तर, मृत्युदंडाची किंवा जन्मठेपेची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि एक लाख रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून दंड केला जाण्यासही पात्र ठरेल;

(दोन) कोणत्याही अन्य बाबतीत, पाच वर्षांहून कमी नसेल परंतु, जन्मठेपेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि पाच लाख रुपये इतक्या किमान दंडाच्या अधीन राहून दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

(२) जी कोणी व्यक्ती एखादा संघटित गुन्हा किंवा संघटित गुन्ह्याच्या पूर्वतयारीचे कोणतेही कृत्य करण्याचा कट करील किंवा प्रयत्न करील किंवा त्याचे समर्थन करील, त्यास अपप्रेरणा देईल किंवा ते करणे जाणूनबुजून सुकर करील, ती पाच वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु जन्मठेपेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि पाच लाख रुपये इतक्या किमान दंडाच्या अधीन राहून दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

(३) जी कोणी व्यक्ती, संघटित गुन्हेगारी संघटनेच्या कोणत्याही सदस्यास आसरा देईल किंवा लपवून ठेवील किंवा आसरा देण्याचा किंवा लपवून ठेवण्याचा प्रयत्न करील, ती पाच वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जन्मठेपेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि पाच लाख रुपये इतक्या किमान दंडाच्या अधीन राहून दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

(४) संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य असणारी कोणतीही व्यक्ती पाच वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु जन्मठेपेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि पाच लाख रुपये इतक्या किमान दंडाच्या अधीन राहून दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

(५) जी कोणी व्यक्ती संघटित गुन्हा करून मिळालेली किंवा प्राप्त झालेली किंवा संघटित गुन्हेगारी संघटनेच्या पैशामधून संपादन करण्यात आलेली आहे अशी कोणतीही मालमत्ता धारण करीत असेल, ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु जन्मठेपेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि दोन लाख रुपये एवढया किमान दंडाच्या अधीन राहून, दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

४. जर कोणतीही व्यक्ती, संघटित गुन्हेगारी संघटनेच्या सदस्याच्या वतीने ती जिच्याबाबतीत समाधानकारकपणे हिशेब देऊ शकत नसेल अशी जंगम किंवा स्थावर संपत्ती जवळ बाळगीत असेल किंवा कोणत्याही वेळी तिने अशी संपत्ती जवळ बाळगलेली असेल तर ती, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि एक लाख रुपये इतक्या किमान दंडाच्या अधीन राहून दंडाच्या शिक्षेसही पात्र ठरेल; आणि अशी संपत्ती कलम २० द्वारे तरतूद केल्यानुसार जप्त व समपहृत केली जाण्यासही पात्र असेल. संघटित गुन्हेगारी संघटनेच्या सदस्याच्या वतीने बेहिशेबी संपत्ती जवळ बाळगल्या-बद्दल शिक्षा

५. (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता किंवा अशा प्रकरणाकरिता किंवा प्रकरणांच्या वर्गाकरिता किंवा गटाकरिता एक किंवा अधिक विशेष न्यायालयाची स्थापना करू शकेल. विशेष न्यायालये.

(२) कोणत्याही विशेष न्यायालयाच्या अधिकारितेसंबंधात कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, तो राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(३) मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने राज्य शासनाने नियुक्त करावयाचा न्यायाधीश विशेष न्यायालयाचा पीठासीन न्यायाधीश असेल. राज्य शासनाला विशेष न्यायालयाच्या

अधिकारितेचा वापर करण्याकरिता, मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने अपर न्यायाधीशांच्या नेमणुका देखील करता येतील.

(४) एखादी व्यक्ती, विशेष न्यायालयाचा न्यायाधीश किंवा अपर न्यायाधीश म्हणून तिची नेमणूक करण्याच्या लगतपूर्वी, सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश असल्याखेरीज तशी नेमणूक केली जाण्यास पात्र असणार नाही.

(५) जेव्हा विशेष न्यायालयात एक किंवा अनेक अपर न्यायाधीशांच्या नेमणुका केलेल्या असतील तेव्हा, विशेष न्यायालयाचा न्यायाधीश, विशेष न्यायालयाच्या कामकाजाची स्वतःसहित एका किंवा अनेक अपर न्यायाधीशांमध्ये कामकाज वाटून घेण्याची, तसेच त्याच्या गैरहजेरीत किंवा कोणत्याही अपर न्यायाधीशांच्या गैरहजेरीत तातडीची कामे निकालात काढण्याची वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे तरतूद करू शकेल.

**विशेष न्यायालयाची अधिकारिता.** ६. संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या प्रत्येक अपराधाची न्यायचौकशी, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत अपराध घडला असेल ते विशेष न्यायालय किंवा, यथास्थिति, कलम ५, पोट-कलम (१) अन्वये अशा अपराधाची न्यायचौकशी करण्यासाठी रचना करण्यात आलेले विशेष न्यायालय यांच्याकडूनच केवळ करता येईल.

**अन्य अपराधांच्या बाबतीत विशेष न्यायालयांचा अधिकार.** ७. (१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करताना, विशेष न्यायालयाला आरोपीवर त्याच न्यायचौकशीच्या वेळी संहितेअन्वये दोषारोप ठेवता येईल अशा कोणत्याही अन्य अपराधाची देखील, जर तो अपराध अशा अन्य अपराधाशी संबंधित असेल तर, न्यायचौकशी करता येईल.

(२) या अधिनियमान्वये कोणत्याही अपराधाची कोणतीही न्यायचौकशी चालू असताना, आरोपी व्यक्तींनी या अधिनियमाखालील किंवा एखाद्या अन्य कायद्याखालील कोणताही अन्य अपराध केला असल्याचे आढळून आल्यास विशेष न्यायालय, अशा व्यक्तीला अशा अन्य अपराधासाठी सिद्धापराधी ठरवू शकेल आणि त्याची शिक्षा देण्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा यथास्थिति, अशा अन्य कायद्याद्वारे त्या अपराधासाठी प्राधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देऊ शकेल.

**सरकारी अभियोक्ता.** ८. (१) प्रत्येक विशेष न्यायालयासाठी राज्य शासन सरकारी अभियोक्ता म्हणून एखाद्या व्यक्तीला नियुक्त करील आणि एक किंवा अधिक व्यक्तींची अपर सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करू शकेल :

परंतु असे की, राज्य शासनाला, एखाद्या प्रकरणासाठी किंवा प्रकरणांच्या गटासाठी विशेष सरकारी अभियोक्त्याची देखील नियुक्ती करता येईल.

(२) एखादी व्यक्ती दहा वर्षांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीसाठी अधिवक्ता म्हणून व्यवसाय करीत असल्याखेरीज सरकारी अभियोक्ता, अपर सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती होण्यास अर्ह असणार नाही.

(३) या कलमान्वये, सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नेमणूक झालेली प्रत्येक व्यक्ती, संहितेचे कलम २, खंड (प) मधील अर्थांतर्गत सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार संहितेच्या तरतुदी परिणामकारक होतील.

**विशेष न्यायालयाची कार्यपद्धती आणि अधिकार.** ९. (१) विशेष न्यायालयाला एखादा अपराध घडल्याची वस्तुस्थितीदर्शक तक्रार त्याच्याकडे आल्यावर किंवा अशा वस्तुस्थितीचा पोलीस अहवाल आल्यावर, आरोपीस न्यायचौकशीसाठी त्याच्याकडे सुपूर्द करण्यात आलेले नसतानाही अपराधाची दखल घेता येईल.

(२) ज्यावेळी विशेष न्यायालयाकडून न्यायचौकशी केली जाण्यायोग्य असलेला अपराध तीन वर्षांहून अधिक नसेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास किंवा दंड केला जाण्यास किंवा या दोहोंस पात्र असेल त्यावेळी, संहितेच्या कलम २६० च्या पोट-कलम (१) मध्ये किंवा कलम २६२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, विशेष न्यायालयास संहितेत विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्या अपराधाची संक्षिप्त न्यायचौकशी करता येईल आणि संहितेच्या कलमे २६३ ते २६५ च्या तरतुदी शक्य होतील तेथवर, अशा न्यायचौकशीला लागू होतील :

परंतु असे की, या पोट-कलमान्वये संक्षिप्त न्यायचौकशी करतेवेळी प्रकरणाचे स्वरूप हे त्याची संक्षिप्त रीतीने न्यायचौकशी करणे अनिष्ट ठरेल अशा प्रकारचे आहे असे विशेष न्यायालयास आढळून आल्यास, विशेष न्यायालय, तपासणी करण्यात आलेल्या कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलावून घेईल आणि अशा अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी संहितेच्या तरतुदींमध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्या प्रकरणाची फेरसुनावणी करण्याची कार्यवाही सुरू करील आणि उक्त तरतुदी दंडाधिकाऱ्याला आणि दंडाधिकाऱ्याच्या संबंधात जशा लागू होतात तशा त्या विशेष न्यायालयाला आणि विशेष न्यायालयाच्या संबंधात लागू होतील :

परंतु आणखी असे की, या कलमान्वये करण्यात आलेल्या संक्षिप्त न्यायचौकशीमधील कोणत्याही अपराधसिद्धीच्या बाबतीत, विशेष न्यायालयाने दोन वर्षांहून अधिक नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देणे कायदेशीर असेल.

(३) विशेष न्यायालयास, अपराधाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असल्याचे किंवा अपराधात सामील असल्याचे अनुमान असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून पुरावा मिळविण्याकरिता अशा व्यक्तीस, अपराधाशी संबंधित आणि तो अपराध घडवून आणण्याशी संबंधित इतर सर्व प्रमुख व्यक्ती किंवा त्याला अपप्रेरणा देणाऱ्या व्यक्तींबाबत त्याला ज्ञात असलेली संपूर्ण आणि सत्य परिस्थिती उघड करण्याच्या अटीवर, माफी देता येईल आणि अशा प्रकारे दिलेली कोणतीही माफी संहितेच्या कलम ३०८ च्या प्रयोजनासाठी त्यातील कलम ३०७ अन्वये दिलेली माफी असल्याचे समजण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, विशेष न्यायालयास, कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी, सत्र न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि विशेष न्यायालय, ते जणू सत्र न्यायालय आहे अशा तऱ्हेने, शक्य होईल तेथवर, संहितेत, सत्र न्यायालयापुढील न्यायचौकशीकरिता विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, अशा अपराधाची न्यायचौकशी करील.

**विशेष न्यायालयाने केलेल्या न्यायचौकशीला अग्रक्रम मिळणे.**

१०. विशेष न्यायालयाकडून या अधिनियमान्वये करण्यात येणाऱ्या कोणत्याही अपराधाच्या न्यायचौकशीला, त्या आरोपीच्या (विशेष न्यायालय नसलेल्या) इतर कुठल्याही न्यायालयातील न्यायचौकशीच्या वर अग्रक्रम मिळेल आणि अशा इतर प्रकरणाच्या न्यायचौकशीपेक्षा ती न्यायचौकशी आधी संपवण्यात येईल आणि त्यानुसार अशा इतर प्रकरणांची न्यायचौकशी आस्थगित राहील.

**साधारण न्यायालयाकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याचा अधिकार.**

११. एखाद्या अपराधाची दखल घेतल्यानंतर, विशेष न्यायालयास तो अपराध त्याने न्यायचौकशी करण्यायोग्य नाही असे वाटले तर, विशेष न्यायालय, अशा अपराधाची न्यायचौकशी करणे त्याच्या अधिकारितेत नसले तरीही, अशा अपराधांची न्यायचौकशी करण्याचे प्रकरण संहितेअन्वये अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे हस्तांतरित करील आणि ज्या न्यायालयाकडे ते प्रकरण हस्तांतरित करण्यात आले असेल, ते न्यायालय, जणू काही त्यानेच त्या अपराधाची दखल घेतली आहे अशा तऱ्हेने त्या अपराधाची न्यायचौकशी करू शकेल.

**अपील.**

१२. (१) संहितेत काहीही अंतर्भूत असले तरीही, अंतर्वादिक आदेश नसेल असा विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा आदेश यांवर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) या कलमाखाली कोणतेही अपील न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा आदेश यांच्या दिनांका-पासून तीस दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल.

सक्षम प्राधिकाऱ्याची नियुक्ती. १३. राज्य शासनास, शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणाऱ्या गृह विभागातील आपल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कलम १४ च्या प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार. १४. (१) या अधिनियमान्वये संघटित गुन्ह्याच्या तपासाच्या कामाचे पर्यवेक्षण करणारा पोलीस अधीक्षक याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला पोलीस अधिकारी, अन्वेषण अधिकाऱ्याने दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत जर तो अशाप्रकारे मध्येच पकडण्यात आल्यामुळे संघटित गुन्हेगारीचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही गुन्ह्याचा पुरावा मिळत असेल किंवा मिळाला असेल तर, प्राधिकार किंवा मान्यता देणारा आदेश मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे लेखी अर्ज सादर करू शकेल.

(२) प्रत्येक अर्जामध्ये खालील माहितीचा समावेश असेल :—

(क) अर्ज करणाऱ्या अन्वेषण अधिकाऱ्याची किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याची आणि तो अर्ज प्राधिकृत करणाऱ्या विभागप्रमुखाची ओळख ;

(ख) अर्जदाराने आदेश काढण्यात यावा या त्याच्या मताचे समर्थन करण्यासाठी ज्यांचा आधार घेतला आहे त्या वस्तुस्थितीचे व परिस्थितीचे विवरण, यात पुढील गोष्टींचा समावेश असेल :—

(एक) करण्यात आलेल्या किंवा करण्यात येत असलेल्या किंवा केला जाण्याची शक्यता असलेल्या संघटित गुन्हेगारीच्या अपराधाचा तपशील ;

(दोन) जेथून किंवा ज्या ठिकाणी संदेश मध्येच पकडावयाचा असेल त्या सुविधांचे स्वरूप व ठिकाण किंवा ती जागा यांचा विशिष्ट तपशील ;

(तीन) मध्येच पकडण्यात यावयाच्या संदेशाच्या प्रकाराचा विशिष्ट तपशील; आणि

(चार) जीचे संदेश मध्येच पकडण्यात यावयाचे आहेत अशा संघटित गुन्हेगारीचा अपराध करत असलेल्या व्यक्तीची, माहिती असल्यास, ओळख ;

(ग) चौकशी करण्यासाठी किंवा माहिती मिळविण्यासाठी इतर पद्धतींचा वापर करण्यात आला व त्यात अपयश आले किंवा कसे किंवा वापर केल्यास अशा पद्धती यशस्वी होणे शक्य नाही असे वाटण्याची किंवा त्या खूप धोकादायक वाटण्याची किंवा त्यामुळे, संदेश मध्येच पकडण्याच्या कामाशी संबंधित असलेल्या व्यक्तींची ओळख उघड होण्याची शक्यता वाटण्याची संयुक्तिक कारण, यासंबंधातील विवरण ;

(घ) किती काळासाठी संदेश मध्येच पकडणे चालू ठेवणे जरूरीचे आहे त्याचे विवरण, चौकशीचे स्वरूप जर वर्णन केलेल्या प्रकाराचा संदेश पहिल्यांदा प्राप्त झाल्यानंतर संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार आपोआपच समाप्त होऊ नये असे असेल तर, त्यानंतर तशाच स्वरूपाचे आणखी संदेश प्राप्त होतील असे ज्या कारणावरून वाटण्याची शक्यता आहे त्या कारणांची पुष्टी करणाऱ्या वस्तुस्थितीचा विशिष्ट तपशील ;

(ङ) अर्ज प्राधिकृत करणाऱ्या व्यक्तीस, त्या अर्जामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्ती, सुविधा किंवा ठिकाणे यांपैकी कोणाचाही ज्यात संबंध असेल असे, दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार मिळण्यासाठी किंवा मान्यता मिळविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे करण्यात आलेले पूर्वीचे सर्व अर्ज आणि अशा प्रत्येक अर्जावर सक्षम प्राधिकाऱ्याने केलेली कार्यवाही, त्यासंबंधातील वस्तुस्थितीचे विवरण ; आणि

(च) ज्या बाबतीत आदेशास मुदतवाढ मागण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत संदेश मध्येच पकडण्यासधून आतापावेतो, प्राप्त झालेले निष्कर्ष किंवा असे निष्कर्ष प्राप्त करण्यात आलेल्या अपयशाचे वाजवी स्पष्टीकरण.

(३) सक्षम प्राधिकारी, अर्जदाराला अर्जाच्या पुष्टीदाखल आणखी तोंडी किंवा लेखी पुरावा सादर करण्यास फर्मावू शकेल.

(४) असा अर्ज आल्यावर सक्षम प्राधिकारी अर्जदाराने सादर केलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे जर असे ठरवील की,—

(क) एखादी व्यक्ती या अधिनियमाच्या कलमे ३ आणि ४ मध्ये नमूद केलेला व शिक्षापात्र ठरवलेला विशिष्ट अपराध करीत आहे, तिने असा अपराध केला आहे किंवा ती असा अपराध करणार आहे असे समजण्यास संभाव्य कारण आहे ;

(ख) अशा प्रकारे संदेश मध्येच पकडल्यामुळे त्या अपराधाशी संबंधित विशिष्ट संदेश प्राप्त होतील असे समजण्यास संभाव्य कारण आहे ;

(ग) चौकशीच्या व माहिती मिळविण्याच्या नेहमीच्या पद्धती वापरण्यात आल्या असून त्यात अपयश आले आहे किंवा वापरण्यात आल्यास अशा पद्धती यशस्वी होणे शक्य नाही किंवा त्या खूपच धोकादायक आहेत किंवा त्यामुळे संदेश मध्येच पकडण्याच्या कामाशी संबंधित असलेल्या व्यक्तींची ओळख उघड होण्याची शक्यता आहे असे वाजवीरीत्या दिसते ;

(घ) असा अपराध घडण्याच्या संबंधात जेथून किंवा ज्या ठिकाणी दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्यात यावयाचा असेल किंवा ज्यांचा वापर करण्यात येत असेल किंवा करण्यात यावयाचा असेल अशा सुविधा किंवा जागा, अशा व्यक्तीला भाड्याने देण्यात आली आहे किंवा तिच्या नावावर आहे किंवा तिच्याकडून सामान्यतः वापरली जात आहे असे समजण्यास संभाव्य कारण आहे ;

तर सक्षम प्राधिकारी, अशा अर्जावर कारणे लेखी नमूद केल्यानंतर, अर्ज फेटाळू शकेल किंवा विनंतीनुसार किंवा फेरबदल केल्यानुसार दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार किंवा त्यास मान्यता देणारा आदेश देऊ शकेल.

(५) या कलमान्वये कोणताही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणाऱ्या किंवा त्यास मान्यता देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रत्येक आदेशात पुढील बाबी विनिर्दिष्ट करण्यात येतील—

(क) ज्या व्यक्तीचे संदेश मध्येच पकडण्यात येणार आहेत त्या व्यक्तीची—माहित असेल तर— ओळख ;

(ख) ज्यांच्या बाबतीत किंवा ज्या ठिकाणी संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देण्यात आला आहे त्या संदेश सुविधेचे किंवा जागेचे स्वरूप आणि स्थान ;

(ग) मध्येच पकडण्यात यावयाच्या संदेशाच्या प्रकाराचे विशिष्ट वर्णन आणि तो ज्याच्याशी संबंधित आहे त्या अपराधाबाबतचे विवरण ;

(घ) संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार ज्या अभिकरणाला देण्यात आला त्या अभिकरणाची आणि अर्ज प्राधिकृत करणाऱ्या व्यक्तींची ओळख ; आणि

(ङ) वर्णन केलेला संदेश पहिल्यांदा प्राप्त झाल्यानंतर संदेश मध्येच पकडण्याची प्रक्रिया आपोआप समाप्त होईल अथवा नाही याच्या विवरणांसह ज्या कालावधीत संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार दिलेला असेल तो कालावधी.

(६) पोट-कलम (४) खाली आदेश दिल्यानंतर लगेचच परंतु, कोणत्याही प्रकरणी, आदेश दिल्यापासून सात दिवसांपेक्षा उशिराची नसेल अशा वेळी, सक्षम प्राधिकारी, त्या आदेशाची एक प्रत व उक्त आदेशाच्या संबंधातील सर्व मूळ कागदपत्रे, अभिलेख तसेच त्या आदेशाच्या संबंधातील त्याचे स्वतःचे निष्कर्ष, इत्यादी, कलम १५ अन्वये रचना करण्यात आलेल्या पुनर्विलोकन समितीकडे त्या आदेशाच्या विचारार्थ व मान्यतेसाठी पाठवील.

(७) अर्जदाराने विनंती केल्यावर, या कलमाखालील दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणाऱ्या आदेशाद्वारे, दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश, सेवा पुरवणारा, जमीन मालक, परिरक्षक किंवा अन्य व्यक्ती यांनी अर्जदारास, तात्काळ, ज्या व्यक्तीचे संदेश मध्येच पकडण्यात यावयाचे आहेत त्या व्यक्तीला अशी सेवा पुरविणारा, जमीन मालक, परिरक्षक किंवा व्यक्ती ज्या सेवा पुरवीत आहे, त्या सेवांमध्ये अडथळा न आणता आणि कमीत कमी हस्तक्षेप करून संदेश मध्येच पकडण्याचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती, सुविधा आणि तांत्रिक सहाय्य द्यावे, असा निदेश देण्यात येईल.

(८) या कलमाअन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाअन्वये, प्राधिकाराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एरवीतर आवश्यक असेल अशा कालावधीपेक्षा कोणत्याही अधिक कालावधीकरिता किंवा कोणत्याही प्रसंगी साठ दिवसांपेक्षा जास्त कालावधीकरिता कोणताही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार किंवा मान्यता देण्यात येणार नाही. असा साठ दिवसांचा कालावधी आदेशान्वये अन्वेषण किंवा कायदा अंमलबजावणी अधिकारी संदेश मध्येच पकडण्याच्या कामास ज्या दिवसास प्रथम सुरुवात करील तो दिवस किंवा आदेश काढल्या-नंतर दहा दिवस यापैकी जो आधीचा असेल त्या दिवसाच्या लगत पूर्वीच्या दिनांकास सुरू होईल. पोट-कलम (१) ला अनुसरून, जर मुदतवाढीसाठी अर्ज केला असेल आणि पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असलेले निष्कर्ष सक्षम प्राधिकाऱ्याने काढलेले असतील तरच केवळ, आदेशास मुदतवाढ देण्यात येईल. मुदतवाढीचा कालावधी हा सक्षम प्राधिकाऱ्याला, ज्याकरिता तो देण्यात आला होता ती प्रयोजने साध्य करण्यासाठी आवश्यक वाटेल अशा कालावधीपेक्षा जास्त असणार नाही आणि तो एका वेळी साठ दिवसांपेक्षा जास्त असणार नाही. प्रत्येक आदेश किंवा त्याची मुदतवाढ, यामध्ये संदेश मध्येच पकडण्याच्या प्राधिकाराचा व्यवहार्य असेल तितक्या लवकरात लवकर वापर करण्यात येईल आणि या कलमान्वये मध्येच पकडले जाण्याच्या अधीन नसतील असे अन्य संदेश मध्येच पकडले जाण्याचे प्रमाण कमी असेल अशा पद्धतीने किंवा रीतीने ते करण्यात येईल आणि ते प्राधिकृत केलेल्या उद्देशाच्या प्राप्तीनंतर किंवा कोणत्याही परिस्थितीत आदेशाची मुदत संपल्यानंतर समाप्त होईल अशा तरतुदींचा समावेश असेल. मध्येच पकडण्यात आलेला संदेश सांकेतिक भाषेत किंवा परदेशी भाषेत असेल आणि त्या परदेशी भाषेतील किंवा सांकेतिक भाषेतील तज्ज्ञ, संदेश मध्येच पकडण्याच्या कालावधीत संयुक्तिकपणे उपलब्ध नसेल तर, असा संदेश मध्येच पकडण्यात आल्यानंतर संदेश मध्येच पकडण्याचे प्रमाण व्यवहार्य असेल तेथवर कमीत कमी करण्यात यावे. या कलमाखाली संदेश मध्येच पकडण्याची प्रक्रिया ही, संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार दिलेल्या अन्वेषण किंवा कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांकडून किंवा राज्य शासनाच्या कंत्राटाअन्वये व्यक्तीकडून संपूर्णत: किंवा अंशत: चालविण्यात येईल.

(९) ज्या वेळी या कलमानुसार, संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणारा आदेश देण्यात येईल त्यावेळी त्या आदेशाद्वारे प्राधिकार दिलेले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने प्रगती करण्यात आलेली आहे आणि संदेश मध्येच पकडण्याचे काम पुढे चालू ठेवण्याची गरज आहे हे दर्शविणारे अहवाल ज्याने आदेश दिलेला असेल त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे देण्यास फर्मावता येईल असे अहवाल सक्षम प्राधिकारी फर्मावील अशा कालांतराने देण्यात येतील.

(१०) या कलमाच्या इतर कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जो अपर पोलीस महानिरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी संयुक्तिकपणे असे ठरवील की—

(क) आणीबाणीची परिस्थिती अस्तित्वात असून त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे,—

(एक) कोणत्याही व्यक्तीला मृत्यूचा किंवा गंभीर शारीरिक इजा होण्याचा तात्काळ धोका ;

(दोन) राज्याची सुरक्षा व हितसंबंध धोक्यात आणणाऱ्या कटकारस्थानात्मक हालचाली ;

(तीन) संघटित गुन्हेगारीच्या स्वरूपाच्या कटकारस्थानात्मक हालचाली ;

ज्यांच्या बाबतीत अशाप्रकारे संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून यथायोग्य कार्यासक्तीने आदेश प्राप्त करणे शक्य होण्यापूर्वी दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडणे आवश्यक आहे असे संभाषण; आणि

(ख) ज्या आधारे असे संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणारा आदेश काढता येईल अशी कारणे आहेत,

तर तो पोट-कलम (१) आणि (२) च्या तरतुदींस अनुसरून, संदेश मध्येच पकडण्याची स्थिती उद्भवल्यानंतर किंवा अशी स्थिती उद्भवण्यास सुरुवात झाल्यानंतर, अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीत, जर संदेश मध्येच पकडण्यास मान्यता देणारा आदेश मिळण्याकरिता अर्ज करण्यात आलेला असेल तर, अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास असा दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा लेखी प्राधिकार देऊ शकेल.

(११) पोट-कलम (१०) खाली संदेश मध्येच पकडण्यास मान्यता देणारा आदेश देण्यात आला नसेल त्याबाबतीत जेव्हा, हवा असलेला संदेश मिळवण्यात येईल किंवा आदेशाकरिता केलेला अर्ज नाकारण्यात येईल, यापैकी जे आधी घडेल तेव्हा असे संदेश मध्येच पकडण्याचे काम तात्काळ बंद होईल. संदेश मध्येच पकडण्याच्या परवानगीकरिता केलेला अर्ज पोट-कलम (४) अन्वये नाकारण्यात आला असेल किंवा मान्यतेकरिता पोट-कलम (१०) अन्वये केलेला अर्ज नाकारण्यात आला असेल किंवा आदेश काढल्याशिवाय संदेश मध्येच पकडण्याचे काम बंद करण्यात आलेले असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत, पकडण्यात आलेला कोणताही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशामधील आशय या कलमाचा भंग करून मिळवला आहे असे समजण्यात येईल.

(१२) (क) या कलमाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही साधनाद्वारे, मध्येच पकडण्यात आलेल्या कोणत्याही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संभाषण यांचा आशय, शक्य असल्यास, ध्वनीफितीवर किंवा दूरध्वनीवर किंवा इतर तुलनात्मक साधनांवर ध्वनिमुद्रित करण्यात येईल. या पोट-कलमाखालील कोणताही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश यांच्या आशयाचे ध्वनिमुद्रण त्यांचे संकलनापासून किंवा फेरफारांपासून संरक्षण होईल अशा प्रकारे करण्यात येईल. आदेशाच्या किंवा त्याच्या मुदतवाढीच्या कालावधी संपल्यानंतर, तावडतोब, असे ध्वनिमुद्रण, असा आदेश काढणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यास, उपलब्ध करून देण्यात येईल व त्याच्या निदेशांनुसार ते मोहोरबंद केले जाईल. सक्षम प्राधिकारी आदेश देईल त्या ठिकाणी ध्वनिमुद्रित आशय अभिरक्षित ठेवण्यात येईल. सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशावरून असेल त्याखेरीज ते नष्ट करण्यात येणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत ते दहा वर्षांकरिता ठेवण्यात येतील.

(ख) या कलमाखाली करण्यात आलेले अर्ज आणि काढण्यात आलेले आदेश, सक्षम प्राधिकाऱ्याकडून मोहोरबंद करण्यात येतील. सक्षम प्राधिकारी निदेश देईल त्या ठिकाणी अर्ज आणि आदेश अभिरक्षित ठेवण्यात येतील आणि सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशावरून असेल त्या खेरीज, ते नष्ट करण्यात येणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत दहा वर्षांकरिता ठेवण्यात येतील.

सक्षम प्राधिकारी, प्रस्ताव दाखल झाल्यावर, स्वविवेकाने, न्यायाच्या दृष्टीने सक्षम प्राधिकाऱ्यास हितकारक आहे असे वाटेल अशा व्यक्तीला किंवा तिच्या समुपदेशीला, मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशांचा, अर्जांचा आणि आदेशांचा असा भाग उपलब्ध करून देईल.

(१३) संहितेमध्ये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही असले तरी, या कलमाअन्वये मध्येच पकडण्यात आलेल्या दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशामार्फत गोळा केलेला पुरावा त्या प्रकरणाच्या न्यायचौकशीच्या वेळी न्यायालयामध्ये आरोपी विरुद्धचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल :

परंतु, या कलमानुसार मध्येच पकडण्यात आलेल्या कोणत्याही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशांचा आशय किंवा त्यातून प्राप्त केलेला पुरावा प्रत्येक पक्षकारास, न्याय चौकशी, सुनावणी किंवा कार्यवाहीच्या दहा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपूर्वी ज्याअन्वये संदेश

मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार किंवा मान्यता दिलेली होती अशा सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाची आणि त्यासोबतच्या अर्जाची प्रत दिलेली नसेल तर कोणत्याही न्यायालयातील कोणतीही न्यायचौकशी, सुनावणी किंवा अन्य कार्यवाही यात पुराव्यादाखल स्वीकारण्यात येणार नाही किंवा अन्यप्रकारे उघड करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, न्यायचौकशी करणाऱ्या न्यायधीशास न्यायचौकशी, सुनावणी किंवा कार्यवाही यांच्या पूर्वी दहा दिवस पक्षकारास वरील माहिती देणे शक्य नव्हते आणि पक्षकारास अशी माहिती मिळण्यास लागलेल्या विलंबामुळे बाधा पोचत नाही असे आढळले तर तो या दहा दिवसांच्या कालावधीच्या बाबतीत सूट देऊ शकेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) "दूरध्वनी संदेश" याचा अर्थ उगम बिंदू आणि जोडणी बिंदू यांच्या दरम्यान; उगम बिंदू आणि ग्रहण बिंदू या दरम्यान (स्विचिंग केंद्रातील अशा जोडणीच्या वापरासह) तार, बीजतार किंवा तत्सम इतर जोडणी यांच्या सहाय्याने दिल्या जाणाऱ्या संदेशांचे पारेषण करण्यासाठी असलेल्या सुविधांचा वापर करून संपूर्णतः किंवा भागशः करण्यात येणारे कोणतेही श्रुतसंदेश हस्तांतरण असा आहे आणि अशा संज्ञेत अशा संदेशांच्या कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साठवणुकीचा समावेश होतो;

(ख) "मौखिक संदेश" याचा अर्थ संदेश मध्येच पकडला जाणार नाही या अपेक्षेला पुष्टी देणाऱ्या परिस्थितीत अशी अपेक्षा दर्शित करणाऱ्या एखाद्या व्यक्तीकडून उच्चारण्यात आलेला कोणताही मौखिक संदेश असा आहे, परंतु अशा संज्ञेत कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संदेशाचा समावेश होत नाही;

(ग) "इलेक्ट्रॉनिक संदेश" याचा अर्थ ज्याचा देशांतर्गत किंवा विदेशी व्यापारावर परिणाम होतो अशी कोणत्याही प्रकारची चिन्हे, संकेत, लेख, प्रतिमा, ध्वनी, माहिती किंवा गुप्तवार्ता यांचे तार, रेडिओ, इलेक्ट्रोमॅग्नेटिक, फोटो इलेक्ट्रॉनिक किंवा फोटो ऑप्टिकल यंत्रणेद्वारे पूर्णतः किंवा भागशः करण्यात येणारे कोणतेही हस्तांतरण असा आहे, परंतु, त्यात पुढील गोष्टींचा समावेश होत नाही,—

(एक) बिनतारी दूरध्वनी हॅन्डसेट आणि आधार युनिट यांच्या दरम्यान पारेषित केला जाणारा कॉर्डलेस दूरध्वनी संदेशाचा रेडिओ भाग;

(दोन) कोणताही दूरध्वनी किंवा मौखिक संदेश;

(तीन) केवळ ध्वनी पेजिंग उपकरणाद्वारे दिलेला कोणताही संदेश; किंवा

(चार) ट्रॅकिंग उपकरणामधून देण्यात आलेला कोणताही संदेश;

(घ) "संदेश मध्येच पकडणे" याचा अर्थ कोणत्याही इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक किंवा अन्य उपकरणाचा वापर करून दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशाद्वारे आशयाचे श्रुत किंवा अन्य संपादन असा आहे.

प्राधिकार देणाऱ्या आदेशांचे पुर्नविलोकन करण्यासाठी पुर्नविलोकन समितीची रचना.

१५. (१) कलम १४ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी एक पुर्नविलोकन समिती असेल.

(२) पुर्नविलोकन समितीमध्ये पुढील पदसिद्ध सदस्य असतील :—

(एक) शासनाचे मुख्य सचिव, — अध्यक्ष.

(दोन) गृह विभागातील यथास्थिति, अपर मुख्य सचिव किंवा वरिष्ठतम प्रधान सचिव, — सदस्य.

(तीन) प्रधान सचिव किंवा सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, — सदस्य.

(३) कलम १४ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश, कलम १४ च्या पोट-कलम (४) अन्वये, संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार देणारा किंवा अर्जास मान्यता देणारा किंवा आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत त्या कलमाच्या पोट-कलम (१०) अन्वये करण्यात आलेला संदेश मध्येच पकडण्याची कृती अमान्य करणारा, सक्षम प्राधिकाऱ्याकडून देण्यात आलेला आदेश आवश्यक, रास्त आणि समर्थनीय होता किंवा कसे हे ठरविण्यासाठी, तो मिळाल्यानंतर दहा दिवसांच्या आत पुनर्विलोकन समितीकडून विचारात घेण्यात येईल.

(४) पुनर्विलोकन समिती, संपूर्ण अभिलेखाची तपासणी केल्यानंतर आणि आवश्यक वाटेल अशी, कोणतीही असल्यास चौकशी केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, सक्षम प्राधिकरणाने काढलेला आदेश मान्य करू शकेल किंवा तो आदेश अमान्य करणारा आदेश देऊ शकेल. पुनर्विलोकन समितीने अमान्य करणारा आदेश दिल्यानंतर अगोदरच सुरू झालेले संदेश मध्येच पकडण्याचे काम, कोणतेही असल्यास तात्काळ खंडित करण्यात येईल. टेप, वायर किंवा इतर उपकरणाच्या स्वरूपात मध्येच पकडण्यात आलेला संदेश, कोणताही असल्यास, कोणत्याही प्रकरणात पुरावा म्हणून स्वीकारला जाणार नाही आणि तो नष्ट करण्याचा निदेश देण्यात येईल.

दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडणे आणि उघड करणे प्रतिषिद्ध असणे.

१६. कलम १४ मध्ये अन्यथा विशेष करून तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त अन्य रीतीने, जो कोणी पोलीस अधिकारी,—

(क) दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश हेतुपुरस्सरपणे मध्येच पकडण्यासाठी पकडण्याचा प्रयत्न करील किंवा संदेश मध्येच पकडण्यासाठी किंवा पकडण्याचा प्रयत्न करण्यासाठी कोणत्याही अन्य व्यक्तीचे सहाय्य मिळवील ;

(ख) एखादे इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक किंवा इतर उपकरण, जेव्हा,—

(एक) असे उपकरण दूरध्वनीला, केबलला किंवा दूरध्वनी संदेशामध्ये वापरल्या जाणाऱ्या तत्सम जोडणीला जोडलेले असेल किंवा त्याद्वारे संदेश पारेषित करीत असेल ; किंवा

(दोन) जेव्हा, असे उपकरण रेडिओद्वारे संदेश पारेषित करीत असेल किंवा अशा संदेशाच्या पारेषणामध्ये हस्तक्षेप करीत असेल ; तेव्हा हेतुपुरस्सरपणे वापरील, वापरण्याचा प्रयत्न करील किंवा वापरण्यासाठी किंवा वापरण्याचा प्रयत्न करण्यासाठी कोणत्याही अन्य व्यक्तीचे सहाय्य मिळवील;

(ग) कोणत्याही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशामधील आशय अशी माहिती या पोट-कलमाचा भंग करून, दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडून प्राप्त केलेली आहे हे माहिती असून किंवा माहीत असण्यास कारण असतांना, अन्य कोणत्याही व्यक्तीकडे हेतुपुरस्सरपणे उघड करील किंवा उघड करण्याचा प्रयत्न करील ;

(घ) कोणत्याही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशातील आशय ती माहिती या पोट-कलमाचा भंग करून, दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडून प्राप्त केलेली आहे हे माहिती असून किंवा माहीत असण्यास कारण असताना हेतुपुरस्सरपणे वापरील किंवा वापरण्याचा प्रयत्न करील ; किंवा

(ङ) (एक) कलम १४ द्वारे प्राधिकृत केलेल्या मार्गांनी मध्येच पकडलेल्या कोणत्याही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशातील आशय;

(दोन) या अधिनियमान्वये, गुन्हा अन्वेषणाच्या संबंधात असा संदेश मध्येच पकडून माहिती मिळविलेली आहे हे माहिती असून किंवा माहीत असण्यास कारण असताना ;

(तीन) गुन्हा अन्वेषणाशी संबंधित माहिती मिळविलेली किंवा मिळालेली असताना; आणि

(चार) रीतसर प्राधिकार दिलेल्या गुन्ह्याच्या अन्वेषणामध्ये अनुचितरीत्या अडथळा आणण्याच्या, व्यत्यय आणण्याच्या किंवा हस्तक्षेप करण्याच्या हेतूने कोणत्याही अन्य व्यक्तीकडे बद्धिपुरस्सरपणे उघड करील किंवा उघड करण्याचा प्रयत्न करील;

(च) कलम १५ च्या पोट-कलम (४) अन्वये पुनर्विलोकन समितीद्वारे संदेश मध्येच पकडण्याची कृती अमान्य करणारा आदेश जारी करण्यात आल्यानंतरही हेतुपुरस्सरपणे दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश पकडण्याचे चालू ठेवील,

तो अशा भंगाकरिता एक वर्षापर्यंत असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस आणि पन्नास हजार रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

पुराव्याचे विशेष नियम. १७. (१) संहितेमध्ये किंवा भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ यात याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील किंवा अधिनियमाशी संबंधित गुन्ह्यांच्या न्यायचौकशीच्या आणि शिक्षेच्या प्रयोजनासाठी न्यायालयास आरोपीच्या संबंधातील पुढील वस्तुस्थिती तिचे पुरावा म्हणून मूल्य असल्याने विचारात घेता येईल :— १८७२ चा १.

(क) आरोपीस संहितेच्या कलम १०७ किंवा कलम ११० अन्वये पूर्वी कोणत्याही प्रसंगी बध्द केले होते ;

(ख) प्रतिबंधक स्थानबद्धतेशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली स्थानबद्ध केले होते ;

(ग) विशेष न्यायालयामध्ये, या अधिनियमाखाली कोणत्याही आधीच्या प्रकरणात खटला भरला होता.

(२) एखाद्या संघटित गुन्ह्यात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा त्याच्यावतीने, कोणत्याही वेळी कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात जंगम किंवा स्थावर मालमत्ता असेल व त्याचे कारण तो समाधानकारक देऊ शकत नाही हे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत उलटपक्षी सिद्ध झाले नसेल तर विशेष न्यायालय, अशी मालमत्ता किंवा आर्थिक साधने ही त्याच्या बेकायदेशीर कामातून त्याने संपादन केली आहेत किंवा मिळवली आहेत असे गृहीत धरेल.

(३) आरोपीने कोणत्याही व्यक्तीचे अपहरण केल्याचे शाबीत झाले असेल तर, विशेष न्यायालय ते त्याने खंडणीसाठी केल्याचे गृहीत धरील.

पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेला विवक्षित कबुलीजबाब विचारात घेण्यात येईल. १८. (१) संहितेमध्ये किंवा भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ मध्ये काहीही असले तरी, परंतु या कलमातील तरतुदींना अधीन राहून, एखाद्या व्यक्तीने पोलीस अधीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेला आणि अशा पोलीस अधिकाऱ्याने एकतर लेखी किंवा ज्यावरून ध्वनी किंवा प्रतिमा पुन: उद्धृत करता येतात अशा कॅसेट, ध्वनीफिती किंवा ध्वनी आलेख यांसारख्या कोणत्याही यांत्रिक साधनांवर अभिलिखित केलेला कबुलीजबाब, अशा व्यक्तीच्या किंवा सह आरोपीच्या, अपप्रेरणा देणाऱ्या व्यक्तीच्या किंवा कट करणाऱ्या व्यक्तीच्या न्यायचौकशीमध्ये ग्राह्य असेल : १८७२ चा १.

परंतु, सह आरोपी, अपप्रेरणा देणारी व्यक्ती किंवा कट करणारी व्यक्ती यांच्यावर त्याच प्रकरणात आरोपीबरोबर दोषारोप केलेला असावा किंवा न्यायचौकशी चाललेली असावी.

(२) कबुलीजबाब मोकळ्या वातावरणात व ज्या भाषेत त्या व्यक्तीची तपासणी करण्यात आली असेल त्याच भाषेत व त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदवून घेण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये कोणताही कबुलीजबाब नोंदवून घेण्यापूर्वी, पोलीस अधिकारी, कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीकडे, तिने असा कबुलीजबाब देणे हे तिच्यावर बंधनकारक नाही आणि जर तिने तसे केले तर, तिच्याविरुद्ध पुरावा म्हणून तो वापरला जाऊ शकेल हे स्पष्ट करील आणि असा पोलीस अधिकारी, असा कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीकडे विचारणा केल्यावर तसा कबुलीजबाब स्वेच्छेने दिला जात आहे याबद्दल त्याची खात्री झाल्याखेरीज असा कोणताही कबुलीजबाब नोंदवून घेणार नाही. संबंधित पोलीस अधिकारी, अशा स्वेच्छा कबुलीजबाबाची नोंद घेतल्यानंतर, त्यावर दिनांक व वेळ नमूद करून, अशा कबुलीजबाबाच्या स्वेच्छा स्वरूपाविषयी त्याची व्यक्तिगत खात्री झाल्याबद्दल कबुलीजबाबाच्या खाली लेखी प्रमाणित करील.

(४) पोट-कलम (१) अन्वये नोंदवलेला प्रत्येक कबुलीजबाब, असा कबुलीजबाब ज्या क्षेत्रामध्ये नोंदवण्यात आला असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असणारा मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्याकडे तात्काळ पाठवण्यात येईल आणि असा दंडाधिकारी, अशा प्रकारे प्राप्त झालेला, अभिलीखित कबुलीजबाब विशेष न्यायालयाकडे पाठवील, व ते न्यायालय अशा अपराधाची दखल घेईल.

(५) जिच्याकडून पोट-कलम (१) अन्वये कबुलीजबाब नोंदवून घेतला असेल त्या व्यक्तीला देखील पोट-कलम (४) अन्वये ज्याच्याकडे असा कबुलीजबाब पाठविणे आवश्यक असेल असा मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्यासमोर गैरवाजवी विलंबाशिवाय, कबुलीजबाबाच्या मूळ लेखी किंवा यांत्रिक साधनांवर नोंदवून घेतलेल्या निवेदनासह हजर करण्यात येईल.

(६) मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्याय दंडाधिकारी अशा प्रकारे हजर करण्यात आलेल्या व आरोपीने केलेले असे कोणतेही निवेदन साक्षेपाने नोंदवून घेईल व त्याची स्वाक्षरी घेईल आणि छळ झाल्याची कोणतीही तक्रार असल्यास, अशा व्यक्तीला, सहायक जिल्हा शल्य-चिकित्सकाच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा वैद्यकीय अधिकाऱ्यापुढे वैद्यकीय तपासणीकरिता हजर करण्याचे निदेश देण्यात येतील.

**साक्षीदारांना संरक्षण.**

१९. (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायालयाची तशी इच्छा असल्यास, या अधिनियमान्वये होणारी कार्यवाही गुप्त रीत्या केली जाईल.

(२) विशेष न्यायालय, त्याच्यासमोर चालणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीतील साक्षीदाराने किंवा अशा साक्षीदाराच्या बाबतीत सरकारी अभियोक्त्याने केलेल्या अर्जावर किंवा त्याच्या स्वतःच्या मताने, कोणत्याही साक्षीदाराची ओळख आणि पत्ता गोपनीय ठेवण्याकरिता त्यास योग्य वाटेल अशी उपाययोजना करील.

(३) विशेषतः आणि पोट-कलम (२) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध येऊ न देता, विशेष न्यायालय त्या पोट-कलमाखाली ज्या उपाययोजना करील त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल---

(क) विशेष न्यायालय ठरवील अशा ठिकाणी कार्यवाही चालवणे;

(ख) लोकांना पाहण्यास खुल्या असणाऱ्या प्रकरणामध्ये त्याने दिलेल्या आदेशात किंवा न्याय-निर्णयात किंवा कोणत्याही अभिलेखामध्ये साक्षीदाराच्या नावाचा आणि पत्त्यांचा उल्लेख टाळणे :

(ग) साक्षीदारांची ओळख आणि पत्ते उघड केले जात नाहीत याची खात्री करण्याकरिता कोणतेही निदेश काढणे ;

(घ) अशा एखाद्या न्यायालयासमोर प्रलंबित असलेली सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्यवाही, लोकहितार्थ, कोणत्याही प्रकारे प्रसिद्ध करू नये असे आदेश काढणे.

(४) पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, एका वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या आणि एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**मालमत्ता जप्त करणे.**

२०. (१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल एखादी व्यक्ती सिद्धापराध ठरलेली असेल तर, विशेष न्यायालयास, कोणतीही शिक्षा देण्याबरोबरच, आरोपीच्या मालकीची असलेली आणि आदेशामध्ये विनिर्दिष्ट असलेली कोणतीही जंगम किंवा स्थावर किंवा या दोन्ही मालमत्ता राज्य शासनाकडे समपहृत होतील व ती सर्व भारांपासून मुक्त असेल असे लेखी आदेशाद्वारे जाहीर करता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीवर या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाचा आरोप असेल त्याबाबतीत, त्याची न्यायचौकशी करणाऱ्या विशेष न्यायालयास, अशा न्यायचौकशीच्या कालावधीत आरोपीच्या मालकीची सर्व किंवा कोणतीही, स्थावर किंवा जंगम किंवा दोन्ही मालमत्ता जप्त करण्यात यावी

असा आदेश देता येईल आणि अशा न्यायचौकशीच्या शेवटी ती व्यक्ती दोषी असल्याचे सिद्ध झाल्यास अशा प्रकारे जप्त करण्यात आलेली मालमत्ता राज्य शासनाकडे समपहृत होईल. तसेच ती मालमत्ता सर्व भारांपासून मुक्त असेल.

(३) (क) कलम १४ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या पर्यवेक्षी अधिकाऱ्याच्या मान्यतेने अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने तयार केलेल्या लेखी अहवालाच्या आधारावर या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणारा अपराध केलेली कोणतीही व्यक्ती फरारी झाली आहे किंवा आपला तपास लागू नये म्हणून ती स्वतःला लपवून ठेवत आहे, असे कोणत्याही विशेष न्यायालयास सकारण वाटत असल्यास, संहितेच्या कलम ८२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असे न्यायालय लेखी उद्घोषणा प्रसिद्ध करून त्याला उद्घोषणेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी आणि अशी उद्घोषणा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांपेक्षा कमी नसलेल्या परंतु तीस दिवसांच्यापेक्षा अधिक नसलेल्या, विनिर्दिष्ट केलेल्या काळात हजर राहण्यास फर्मावील :

परंतु, जर अन्वेषण करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्याला फरारी झालेल्या किंवा लपून बसलेल्या आरोपीला, अशा व्यक्तीविरुद्ध अपराधाची नोंद झालेल्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अटक करण्यात अपयश आले तर, तो अधिकारी उक्त कालावधी समाप्त झाल्यावर, उद्घोषणा काढण्याकरिता विशेष न्यायालयाला कळवील.

(ख) खंड (क) खाली उद्घोषणा काढणारे विशेष न्यायालय, कोणत्याही वेळी, उद्घोषित केलेल्या व्यक्तीच्या मालकीची असणाऱ्या, कोणत्याही जंगम किंवा स्थावर किंवा दोन्ही मालमत्तेवर जप्ती आणण्याचे आदेश देईल, आणि संहितेच्या कलमे ८३ ते ८५ यांतील तरतुदी, ती जप्ती त्या संहितेखाली केली असल्याप्रमाणे अशा जप्तीला लागू होतील.

(ग) जिची मालमत्ता संहितेच्या कलम ८५ च्या पोट-कलम (२) खाली राज्य शासनाच्या ताब्यात असेल अशी कोणतीही व्यक्ती, जप्ती आणल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, स्वेच्छेने हजर झाली किंवा पकडण्यात आली आणि ज्याच्या आदेशाने मालमत्ता जप्त केली होती त्या विशेष न्यायालयासमोर किंवा ज्या न्यायालयाला असे न्यायालय दुय्यम असेल त्याच्यासमोर आणण्यात आली आणि तिने जर, पकडले जाण्याचे टाळण्याच्या उद्देशाने ती फरारी झाली नव्हती किंवा लपून राहिली नव्हती, आणि उद्घोषणेच्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत हजर राहणे शक्य होण्यासाठी तिला ती नोटीस मिळालेली नव्हती, असे न्यायालयाची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध केले तर, अशी मालमत्ता किंवा, ती जर विकण्यात आली असेल, तर तिचे निव्वळ उत्पन्न आणि उर्वरित मालमत्ता, त्यातून जप्तीच्या परिणामी झालेला सर्व खर्च भागवल्यानंतर तिच्या सुपूर्द करण्यात येईल.

संहितेच्या विवक्षित तरतुदी सुधारित स्वरूपात लागू करणे.

२१. (१) संहितेमध्ये किंवा कोणत्याही अन्य कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला प्रत्येक अपराध संहितेच्या कलम २, खंड (क) च्या अर्थांतर्गत दखलपात्र अपराध असल्याचे मानण्यात येईल आणि त्या खंडामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे "दखलपात्र प्रकरण" याचा अन्वयार्थ लावण्यात येईल.

(२) संहितेचे कलम १६७ हे या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाचा अंतर्भाव असलेल्या प्रकरणाच्या संबंधात पुढील फेरबदलांच्या अधीन राहून लागू होईल, पोट-कलम (२) मध्ये,—

(अ) ज्या ज्या ठिकाणी "पंधरा दिवसांएवढ्या" आणि "साठ दिवसांच्या" असा निर्देश करण्यात आलेला असेल त्या त्या ठिकाणी त्याचा अन्वयार्थ अनुक्रमे "तीस दिवसांएवढ्या" आणि "नव्वद दिवसांच्या" असा लावण्यात येईल ;

(ब) विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, नव्वद दिवसांच्या उक्त कालावधीच्या आत अन्वेषणाचे काम पूर्ण करणे शक्य नसेल तर विशेष न्यायालय अन्वेषणाची प्रगती आणि आरोपीला नव्वद दिवसांच्या उक्त कालावधीपेक्षा अधिक काळ स्थानबद्ध करण्यासंबंधीची विशिष्ट कारणे दर्शविणारा सरकारी अभियोक्त्याचा अहवाल आल्यावर उक्त कालावधी एकशेऐंशी दिवसांपर्यंत वाढवील.".

(३) संहितेच्या कलम ४३८ मधील कोणतीही गोष्ट, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध केल्याच्या आरोपावरून कोणत्याही व्यक्तीला झालेल्या अटकेचा समावेश असणाऱ्या कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत लागू होणार नाही.

(४) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ती अभिरक्षेत असेल तर,—

(क) अशा मुक्ततेच्या अर्जाला विरोध करण्याची सरकारी अभियोक्त्याला संधी दिल्याखेरीज; आणि

(ख) सरकारी अभियोक्त्याने अर्जास विरोध केला असेल त्याबाबतीत ती अशा अपराधाबद्दल दोषी नाही हे मानण्यास पुरेशी कारणे आहेत आणि जामीनावर मुक्त असताना ती कोणताही अपराध करण्याची शक्यता नाही, अशी न्यायालयाची खात्री पटल्याखेरीज,

जामीनावर किंवा तिच्या स्वतःच्या बंधपत्रावर मुक्त करण्यात येणार नाही.

(५) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रस्तुत अपराध घडल्याच्या दिनांकास, आरोपीस या अधिनियमाखालील किंवा इतर कोणत्याही अधिनियमाखालील अपराधाच्या बाबतीत जामीनावर मुक्त होता असे न्यायालयास दिसून आले तर, आरोपीस जामीन देण्यात येणार नाही.

(६) पोट-कलम (४) मध्ये जामीन देण्यासाठी विनिर्दिष्ट केलेले निर्बंध हे, संहितेअन्वये किंवा जामीन देण्यासाठी त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये दिलेल्या निर्बंधाच्या शिवाय आणखी असलेले निर्बंध आहेत.

(७) एखाद्या व्यक्तीला, अभ्यारोपपूर्व किंवा न्यायचौकशीपूर्व चौकशीसाठी न्यायालयीन अभिरक्षेतून पोलीस अभिरक्षेत घेण्याची मागणी करणारा पोलीस अधिकारी, लेखी निवेदन दाखल करील व त्यात असा ताबा मिळण्याबाबतची तसेच, पोलीस अभिरक्षा मिळविण्यासाठी विलंब झाला असल्यास, त्याबाबतची कारणे विशद करील.

२२. (१) कलम ३ खालील शिक्षापात्र असलेल्या संघटित गुन्हेगारी अपराधाच्या खटल्यामध्ये,— कलम ३ खालील अपराधाच्या विषयातील गृहीतक.

(क) आरोपींकडून, बेकायदेशीर शस्त्र आणि दस्तऐवज किंवा कागदपत्रांसह इतर साहित्य प्राप्त झाले आणि असा अपराध करताना, अशा बेकायदेशीर शस्त्रांचा आणि साहित्य व दस्तऐवज किंवा कागदपत्रांसह इतर साहित्याचा, वापर करण्यात आला असे मानण्यास संयुक्तिक कारण आहे, असे सिद्ध झाले तर ; किंवा

(ख) तज्ज्ञाच्या पुराव्याद्वारे, आरोपीच्या बोटांचे ठसे अपराधाच्या जागेवर किंवा असा अपराध करण्याच्या संबंधात वापरण्यात आलेल्या बेकायदेशीर शस्त्रांवर किंवा इतर साहित्य आणि दस्तऐवज अथवा कागदपत्रे व वाहने यांसह कशावरही आढळून आल्याचे सिद्ध झाले तर,

विशेष न्यायालय, याविरुद्ध काही सिद्ध होईपर्यंत, त्या आरोपीनेच असा अपराध केल्याचे गृहीत धरील.

(२) कलम ३ च्या पोट-कलम (२) खाली शिक्षापात्र असलेल्या संघटित गुन्हेगारीच्या अपराधाच्या खटल्यामध्ये आरोपी, संघटित गुन्हेगारीच्या अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीस किंवा तसा याजवी संशय असणाऱ्या व्यक्तीस वित्तीय सहाय्य देतो असे सिद्ध झाले तर, याविरुद्ध काही सिद्ध होईपर्यंत, विशेष न्यायालय, उक्त पोट-कलम (२) खालील अपराध अशा व्यक्तीने केल्याचे गृहीत धरील.

२३. (१) संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी,— अपराधाची दखल घेणे आणि अन्वेषण करणे.

(क) या अधिनियमाखाली कोणताही संघटित गुन्हेगारीचा अपराध केल्याबाबतची कोणत्याही माहितीची नोंद, पोलीस उप महानिरीक्षक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय कोणताही पोलीस अधिकारी करणार नाही;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदीखालील कोणत्याही अपराधाचे अन्वेषण, पोलीस उप अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांकडून केले जाणार नाही.

(२) विशेष न्यायालय, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची, पोलीस अपर महासंचालक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय दखल घेणार नाही.

**कर्तव्ये पार पाडण्यात लोकसेवक कसूर करणाऱ्या लोकसेवकांना शिक्षा.**

२४. कलम २ च्या खंड (ङ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे संघटित गुन्हा करण्याच्या कामी असणाऱ्या कोणीही, कोणत्याही स्वरूपाची कोणतीही मदत किंवा सहाय्य केले– मग ते संघटित गुन्हेगारी संघटनेच्या सदस्याने कोणताही अपराध करण्यापूर्वी असो, किंवा केल्यानंतर असो– किंवा या अधिनियमान्वये कायदेशीर उपाययोजना केली नाही किंवा या संदर्भात कोणत्याही न्यायालयाने किंवा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याचे हेतुतः टाळले तर त्यास तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या दोन्हीपैकी कोणत्याही प्रकारच्या कारावासाची आणि तसेच दंडाची शिक्षा होईल.

**अधिभावी परिणाम.**

२५. या अधिनियमाच्या तरतुदी, किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा अशा कोणत्याही नियमान्वये दिलेला कोणताही आदेश, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात किंवा कायद्याचा प्रभाव असलेल्या कोणत्याही लेखात तद्विरूद्ध काहीही असले तरी, परिणामक होईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.**

२६. हा अधिनियम, किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा अशा कोणत्याही नियमान्वये दिलेला कोणताही आदेश याला अनुलक्षून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासनाविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्या-विरूद्ध किंवा प्राधिकाऱ्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

**मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशाचा वार्षिक अहवाल.**

२७. (१) राज्य शासन—

(एक) संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार मिळण्यासाठी पोलीस विभागाकडून सक्षम प्राधिकाऱ्यास प्राप्त झालेल्या, ज्यांच्या बाबतीत कार्यवाहीस प्रारंभ झाला आहे अशा अर्जांची संख्या ;

(दोन) मान्य करण्यात किंवा नाकारण्यात आले आहेत अशा अर्जांची संख्या ;

(तीन) आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशांची संख्या आणि अशा बाबींमध्ये कार्योत्तर प्राधिकार दिलेल्या किंवा मान्यता दिलेल्या किंवा नाकारलेल्या संदेशांची संख्या ;

(चार) अशा मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशांच्या आधारे प्रारंभ झालेल्या कार्यवाहींची संख्या आणि अशा मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशांच्या परिणामी झालेल्या दोषसिद्धींची संख्या ;

यांचा संपूर्ण तपशील देणारा वार्षीक अहवाल व त्यासोबत मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशांची उपयुक्तता व महत्त्व यांचे सर्वसाधारण मूल्यनिर्धारण करणारे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन तयार करण्याची व्यवस्था करील.

(२) असा वार्षिक अहवाल, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या समाप्तीपासून तीन महिन्यांच्या आत राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर राज्य शासनाकडून मांडण्यात येईल :

परंतु, वार्षिक अहवालामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबी, राज्याच्या सुरक्षेस किंवा कोणत्याही संघटित गुन्हेगारीच्या प्रतिबंधास किंवा तपासास बाधक ठरत आहेत असे राज्य शासनाचे मत झाल्यास राज्य शासन, अशा बाबी अशा वार्षिक अहवालामध्ये अंतर्भूत करण्यातून वगळू शकेल.

२८. उच्च न्यायालयास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या, विशेष न्यायालयाशी संबंधित तरतुदी पार पाडण्यासाठी त्यास, आवश्यक वाटतील असे नियम करता येतील. उच्च न्यायालयाचा नियम करण्याचा अधिकार.

२९. (१) कलम २८ अन्वये नियम करण्याच्या उच्च न्यायालयाच्या अधिकारास बाध न आणता, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदती-करिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा पूर्वोक्तानुसार त्यानंतरची अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल तर व असा निर्णय ते राजपत्रात अधिसूचित करतील तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमाअन्वये पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या वैधतेस बाध येणार नाही.

१९ चा अध्या. ३. ३०. (१) महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अध्यादेश, १९९९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये, यथास्थिति, करण्यात आलेली कृती, किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ति मुद्रणालय, मुंबई.